# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२१ जानेवारी,२०१९



☎ : 07172-264300

: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २१/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **गोंडपिंपरी, बल्लारशाह, दुर्गापुर, ब्रम्हपुरी, सावली, राजुरा, धाबा, गडचांदुर, कोरपना** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१२** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०१** आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **१६,८५,०००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

**६) पोलीस स्टेशन रामनगर :—**

दिनांक **२१/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **रामनगर** अंतर्गत जलनगर वार्ड चंद्रपुर येथे ०१ आरोपी ईसम हा सटट्ापटट्ीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **रामनगर** येथे अप. क्र. **८९/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **५२५/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **रामनगर** पोलीस करीत आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध दारू तस्करीवर कार्यवाही
# १८ लक्षच्या मुद्देमाल हस्तगत

दिनांक २१/०१/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, वणी रोड नारंडा मार्गे एका पांढऱ्या रंगाची बोलेरो पिकअप क्र. एमएच ३४ एम ३०६४ या वाहनाने दारूची अवैधरित्या वाहतुक होणार आहे अशा माहितीवरून स्थागुशा पथकाने नारंडा फाटा पेट्रोलपंप जवळ नाकेबंदी केली असता वणी रोड कडुन मिळालेल्या माहितीप्रमाणे एक पांढऱ्या रंगाची बोलेरो क्र. एमएच ३४ एम ३०६४ हे वाहन येतांना दिसले. वाहनचालकाने पोलीसांची नाकेबंदी पाहुन सदरचे वाहन थांबवुन वाहन रस्त्यात सोडुन पसार झाले. पोलीस पथकाने सदरचे वाहन ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनाच्या विशेष कप्प्यात १४१ पेटया देशी दारूने भरलेल्या १४,१०० निपा किंमत १४,१०,०००/रू. चा माल मिळुन आला. सदरचा माल व त्यातील वापरण्यात आलेले वाहन किंमत ४ लाख रू. **असा एकुण १८,१०,०००/रू.** चा माल जप्त करून याबाबत पोलीस स्टेशन कोरपना अप क्र. १६/२०१९ कलम ६५ (अ), ८३ महाराष्ट्र दारूबंदी कायदा सहकलम १८८ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपुर हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही डॉ. श्री. महेश्वर रेड्डी पोलीस अधिक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपुर यांचे नेतृत्वात पोहवा राजकुमार देशपांडे, पोहवा अरूण खारकर, पोशि अमोल धंदरे, पोशि रविंद्र पंधरे व चापोशि प्रितम रामटेके यांनी पार पाडली.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# २६ जानेवारी बाबत अधिसुचना

दिनांक २६/०१/२०१९ रोजी पोलीस मुख्यालय, चंद्रपूर येथील कवायत मैदानावर प्रजासत्ताक दिनी मुख्य ध्वजारोहण सोहळा साजरा होत असल्याने रहदारीला अडथळा होवुन जनतेला त्रास होवू नये तसेच घातपात संबंधी अतिदक्षतेचा इशारा असल्याने कुठलाही अनुचित प्रकार घडु नये म्हणुन पोलीस अधीक्षक, चंद्रपूर शहरातील रहदारीचा मार्ग दिनांक २६/०१/१९ चे सकाळी ०७:०० वाजता पासुन ते १२:०० वाजेपर्यतच्या कालावधीसाठी वाहनांची रहदारीचे खालील प्रमाणे निर्देशीत करीत आहे.

## जड वाहनास बंदी व वाहन धारकांना सुचना

१. नागपूरकडुन चंद्रपूर शहरात मुलरोडकडे जाणारी जड वाहने ट्रायस्टॉर हॉटेलच्या पलीकडे रोडलगत थांबतील.

२. मुलकडुन चंद्रपूरकडे येणारी जड वाहने एमईल नाक्याच्या पलिकडे थांबतील.

३. बल्लारशाकडुन येणारी जड वाहने प्रसन्ना पेट्रोलपंपाच्या पलिकडे रोडलगत थांबतील.

४. ध्वजारोहण परिसरात व्हिआयपी च्या वाहन ताफ्याव्यतिरिक्त कुठलेही वाहन पार्क होणार नाही.

५. नागपूर रोड विद्यानिकेतन विद्यालयासामोरील, बल्लारशा रोड डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम गार्डन समोरील रस्ता, रामाळा तलाव रोड, दाताळा रोड या ठिकाणी दर वर्षी प्रजासत्ताक दिनी अनेक विद्यार्थ्यांकडुन दुचाकीवर संटबाजी करुन, कर्कश हॉर्ण वाजवुन तसेच अल्पवयीन विद्यार्थी वाहने चालवुन मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन होत असते. २६ जानेवारीला सदर ठिकाणी पोलीस विभागाकडुन फोटाग्राफी व व्हिडीओग्राफी करण्यात येणार असुन ज्या वाहन चालकांकडुन मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन होईल अशा वाहन चालकांवर कठोर कार्यवाही करण्यात येणार आहे. तरी कुणीही कर्कश हॉर्ण वाजवु नये तसेच मोटार सायकलने स्टंटबाजी करु नये तसेच सायलंसर द्वारे फटाके फोडु नये. सामाण्य जनतेला त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. उपरोक्त बाबींचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर गुन्हे नोंद करुन कडक कार्यवाही करण्यात यईल. नागरिकांनी अशा वाहनचालकाची व वाहन क्रमांकाची माहिती नोंद करुन पोलीसांना द्यावी.

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)


**पार्किंग झोन खालील प्रमाणे घोषीत करण्यात आले आहे.**

१. प्रशासकीय भवनाचे समोरील मोकळी जागा दुचाकी पार्किंग करीता.
२. प्रशासकीय भवनाच्या मागील मोकळी जागा कार पार्किंग करीता .
३. सिध्दार्थ हॉटेल समोरील रोडवर सावरकर चौक के ताडोबा टी पॉइंट.
४. पोलीस मुख्यालय सि—६० ऑफीस समोर व आजुबाजुचा मोकळा परिसर या ठिकाणी परेड करीता येणारे अधिकारी कर्मचारी यांची दुचाकी वाहने तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या सायकल करीता.
५. पोलीस मुख्यालयचे मुख्य गेट ते एटीएम पर्यंतचा संपुर्ण रस्ता नो—पार्किंग झोन म्हणुन घोषीत करण्यात येत आहे.

**नागरिकांना सुचना**

१. अतिदक्षेतेचा इशारा देण्यात आला असल्याने नागरिकांनी कार्यक्रमास येतांना कोणत्याही प्रकारचे घातक वस्तु सोबत बाळगु नये.
२. संशयीत व्यक्ती किंवा वस्तु आढळल्यास त्याची माहिती त्वरित पोलीसांना द्यावी.
३. पोलीस मुख्यालय येथे मुख्य ध्वजारोहन कार्यक्रमास येणाऱ्या सर्व नागरिकांना तपासणी करुनच आत सोडण्यात येईल.

दिनांक २६ जानेवारी २०१९ रोजी प्रजासत्ताक दिनी जनतेने वरील वाहतुक व्यवस्थेचे पालन करून शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखणे कामी पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

---